# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/04/2023 (शनिवार) सकाळ


## चोरीच्या गुन्हयातील १८ वर्षापासुन फरार आरोपी गजाआड

मा. पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण यांचे आदेशान्वये संपुर्ण जिल्हयात पाहिजे असलेले आरोपी यांची मोहीम सुरू असतांना मार्गदर्शनात नागपूर उपविभागात पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध घेत असतांना गोपनीय बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोस्टे एमआयडीसी बोरी येथील अप क्र. ५५/२००५ कलम ३७९, ३४ भांदवि मधील पाहिजे असलेला **आरोपी नामे– वाल्मीकी उर्फ बाल्या लोकचंद हरीणखेडे** हा पोलीस स्टेशन गोरेगाव जिल्हा गोंदीया हद्दीत राहत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सदर आरोपीचा शोध घेतला असता सदर आरोपी हा घरी हजर मिळुन आला. सदर आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता सदर आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यावरून सदर गुन्हयात आरोपीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीची वैदयकीय तपासणी करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे एमआयडीसी बोरी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, महेश जाधव, पोलीस नायक मयुर ढेकळे, अमृत किनगे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर